महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग,

# कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद

# नागरीकांची सनद

**सुची**



| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना. | १ |
| २. | कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद या कार्यालयाची बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी. | २ व ३ |
| ३. | कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद या कार्यालयाची रचना. | ३ व ४ |
| ४. | उपविभागीय कार्यालयाचे नावे व कार्यक्षेत्र. | ४ |
| ५. | विभागांतर्गत कार्यपुर्तीची वेळापत्रक, माहितीची सुलभता इत्यादी | ४ व ५ |
| ६. | विभागाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता. | ५ |
| ७. | गाऱ्हाण्याचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्याच्या सुचना. | ५ व ६ |
| ८. | सनदेची अमलबजावणी व प्रतिसाद. | ६ |
| ९. | परिशिष्टे ‘अ’ | ७ |
| १०. | परिशिष्टे ‘क’ | ८ |
| ११. | नागरिकांची  सनद | ९ |
| १२. | मॅन्युवल ९ व १० | १० ते १३ |

## १) प्रस्तावना.

महाराष्ट्र शासनाच्या १५० वर्षाहुन जास्त गौरवशाली परंपरा असलेल्या सार्वजनिक बाधकाम विभागांतर्गत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद हे कार्यालय दिनांक ११/२००४ पासून कार्यरत आहे. हे कार्यालय दिनांक ११/२००४ ला स्थापन्न झाल्यापासून मुख्य अभियंता, सार्वजनिक बाधकाम प्रादेशीक विभाग, औरंगाबाद याचे कार्यकक्षेत अधिनस्त होते. तथापी शासन आदेश क्रमांक ईएसटी-१००९/प्र.क्र.-२७८/प्रशासन-१ दिनांक १४/१२/२००९ पासून हे विभागीय कार्यालय मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) महाराष्ट्र शासन, ५ वा मजला कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयास वर्ग करण्यात आले असून प्रत्यक्षात दिनांक ३१/३/२०१० पासून हे विभागीय कार्यालय मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.), महाराष्ट्र शासन, ५ वा मजला, कोकणभवन, नवी मुंबई येथे वर्ग झाले आहे.

या विभागीय कार्यालयांतर्गत सोलापुर-उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ (किमी २२१/०० ते किमी ३७९/७६०) हा रस्ता दुरुस्ती व देखभालीसाठी कार्यरत आहे. या रस्त्याची राष्ट्रीय महामार्गाची विभागणी (१) सहाय्यक कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उप विभाग, औरंगाबाद (२) सहाय्यक कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उप विभाग, कन्नड (३) उप विभागीय अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, वैजापुर (अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, औरंगाबाद यांच्या अधिनस्त). (४) उप विभागीय अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, गंगापुर (अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, औरंगाबाद यांच्या अधिनस्त असुन सदर उपविभागाचे नामाभिधान विशेष प्रकल्प विभाग क्रं. २, सिल्लोड, असे करण्यात आले असुन तो सिल्लोड जि. औरंगाबाद येथे स्थलांतरीत झाला आह) या चार उपविभागात केलेली आहे. हे उप विभाग कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद यांचे अधिपत्याखाली कार्यरत आहे. मराठवाडयातील नागरीकांशी बांधीलकी जपण्यास हे कार्यालय कटीबध्द आहे. ही बांधीलकी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद (बांधकाम विभाग परिसर पदमपुरा औरंगाबाद) या सनदेव्दारे जाहीर करीत आहे. हे कार्यालय नागरीकांना पुढील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपुर्वक व सन्मानपुर्वक वागणुकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरीकांचे सामाजीक प्रश्न सहानुभूतीपुर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेऊन तसेच सर्वसामान्य नागरीकांसाठी ही सनद तयार करण्यात आली आहे.

## २) राष्ट्रीय महामार्ग विभाग,औरंगाबाद या कार्यालयाची बांधलीकी व नागरीकांची जबाबदारी .

### राष्ट्रीय महामार्ग विभाग या कार्यालयाची बांधलीकी

१) राष्ट्रीय महामार्ग सोलापुर-औरंगाबाद-धुळे रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ (किमी २२१/०० ते किमी ३७९/७६०) या मार्गाची देखभाल व दुरुस्ती मानकाप्रमाणे करुन रस्त्याचा दर्जा उत्तम राखणे.

२) या विभागाच्या कार्यालयांशी सलग्न असलेल्या इतर शासकीय विभागांना तात्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसूत्रता ठेवणे.

३) या कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शीत करणे.

४) आपत्‌कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने अभियांत्रिकीशी संबधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

५) या कार्यालयात व कार्यालयाच्या कार्यकक्षेतील सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्य व जबाबदा-या फलकावर जाहीर रीत्या प्रदर्शीत करणे.

६) या कार्यालयात व कार्यालयाच्या कार्यकक्षेतील प्रत्येक कार्यालयात ठरवुन दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी, तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावी पणे निराकरण करणे.

७) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या कार्यालयाच्या कार्यकक्षेतील मागितलेली माहिती संबधीतांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे बाबत संबधीत विभागीय स्तरावर कार्यवाही करणे.

८) कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेऊन व आधुनिकता आणुन या विभागाच्या कार्यालयांची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुकता वाढविणे.

९) संगणीकरणाबाबत या विभागाच्या सर्व उपविभागांतर्गत उप विभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्क जोडणे. प्रादेशीक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्क द्वारे आवश्यक व तातडीची माहीती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

१०) या विभागांतर्गत आवश्यक व अद्ययावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक विभागाच्या (www.mahapwd.com) संकेत स्थळावर उपलब्ध करणे व अद्ययावत करणे.

११) सर्वविषयांची अनुसूची तयार करणे व निपटारा करण्याचा विहित कालावधी ठरविणे.

१२) कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेखकक्ष नोंद वहीसह अद्ययावत करणे.

१३) नागरीकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

वरील सर्व कर्तव्य पार पडतांना राष्ट्रीय महामार्ग विभाग औरंगाबाद खालील कर्तव्य पार पाडतील.

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधलीकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व आपुलकीची भावना ठेऊन कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील या साठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे / ना-हरकतप्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरीकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

**नागरीकांची जबाबदारी.**

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याशी नागरीकांची वर्तणुक सौजन्य पुर्वक असावी.

नागरीकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपुर्णरित्या मिळावी.

नागरीकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

विहित केलेल्या कालवधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

नागरीकांनी स्वेच्छेने  अतिक्रमणे दुर करावीत व पुन्हा सरकारी जागेवर अतिक्रमणे करु नये.

रस्त्याच्या दोन्ही बाजुना असणा-या वक्षाचे जतन करणे ही नागरीकांची सुध्दा जबाबदारी राहील.

नांगरीकांनी कायदेशीर तरतुदी, नियम अलीखित संकेत यांचे पालन करावे.

नागरीकांनी सार्वजनिक हीत, एकात्मता व अखंडता जापसण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

**३) राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद कार्यालयाची रचना.**

अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांच्या अंतर्गत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद हे कार्यालय शासनाने दिनांक २०/०१/२०१० रोजी स्थापन केले आहे. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखाली

१) सहाय्यक कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उप विभाग, औरंगाबाद.

२) सहाय्यक कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उप विभाग, कन्नड.

३) उप विभागीय अभियंता, विशेष प्रकल्प उपविभाग, वैजापुर. का.अ.सा.बां. (प) विभाग, औरंगाबाद यांच्या अधिनस्त आहे.

४)उप विभागीय अभियंता, विशेष प्रकल्प उपविभाग क्र.२, सिल्लोड, का.अ.जा.बँ.प्र विभाग, औरंगाबाद यांच्या अधिनस्त आहे. हे चार विभाग येतात.

या उपविभागा मार्फत रा.म. २११ (किमी २२१/०० ते ३७९/७६०) ची देखभाल व दुरूस्ती करण्यात येते. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखाली २ सहाय्यक कार्यकारी अभियंता व २ उपविभागीय अभियंता असून यांच्या अधिपत्याखाली एकुण २१ कनिष्ठ अभियंता कार्यरत आहे.

कार्यकारी अभियंता यांच्या कार्यक्षेत्राचा नकाशा सहाय्यक कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियता यांची मुख्यालये दर्शविणारी वृक्ष तक्ता (Tree Chart) परिशिष्ट **अ** म्हणुन सोबत जोडला आहे.

कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग हा ख-या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो.कुठलेही रस्ते, बांधकामाची सविस्तर माहीती अगदी सुरुवातीपासून संबधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळु शकते.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम पुरवीतअसतो या विभागांतर्गत कामांच्या अमलबजावणासाठी सा.बां.नियमावली, लेखासहिंता, विनिर्देश वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-याकडून केले जाते.

## ४) <u>उपविभागीय कार्यालयाची नावे व कार्यक्षेत्रे.</u>

१) **रा**ष्ट्रीय महामार्ग उप विभाग, औरंगाबाद.रा.म.क्र.२११ (२२१/०० ते ३११/८००) लांबी ९०.८००
२) राष्ट्रीय महामार्ग उप विभाग, कन्नड. रा.म.क्र.२११ (३११/८०० ते ३७९/७६०) लांबी ६७.९६०
एकुण लांबी १५८.७६०
३) विशेष प्रकल्प उप विभाग, वैजापुर का.अ.सा.बां.(प) विभाग, औरंगाबाद यांच्या अधिनस्त आहे.

४) विशेष प्रकल्प उप विभाग, गंगापुर सध्या हा उप विभाग का.अ.जा.बँ.प्र.विभाग,औरंगाबाद यांच्या अधिनस्त झाला असून त्याचे नामाभिधान वि.प्र.उप विभाग क्र.२ सिल्लोड असे करण्यात आले असून तो ता.सिल्लोड जि.औरंगाबाद येथे स्थंलातरीत झाला आहे.

## ५) विभागांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता इत्यादी.

### अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक.

कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी व ना-हरकत प्रमाणपत्रावर कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती; तसेच सर्व पुल व इमारती आणि इतर कामाविषयाची माहिती कार्यवृतांत वेळापत्रकात (परिशिष्ट 'क') नमुद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे यांची माहिती विहित पत्रे भरुन संबधीत उप विभागीय कार्यालयास मिळु शकेल*.

* नैसर्गीक आपत्ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालवधीत वाढ होऊ शकेल.

**ब) माहितीची सुलभता.**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (www.mahapwd.com) या संकत स्थळावरुन वेळोवेळी सादर केल्या जाणा-या विभागांतर्गत माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**६) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता.**

सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन स्तरावर रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी अपघात निवारण समिती स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यावरील अपघात निवारण समितीने राष्ट्रीय महामार्ग विभाग औरंगाबाद कार्यक्षेत्रातील प्रत्यक्ष पाहणी करुन सुचविलेल्या अपघात प्रवण स्थळांची सुधारणा उपाययोजना टप्प्या टप्प्यांने हाती घेतली आहे. या मध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या एकुण लांबी मध्ये प्रामुख्याने अपघात प्रवण स्थळे सुचविले असून त्यापैकी अपघात प्रवण स्थळांची सुधारणा प्राधान्याने हाती घेऊन पुर्ण करण्यात आली आहेत. व उर्वरित अपघात प्रवणस्थळांची सुधारण करणे अद्याप बाकी आहे. त्यासाठी आवश्यक त्या रस्त्यावर तपशील वार व आवश्यक असे माहितीफलक लावण्यात आले आहेत जेणे करुन रस्ते वाहतुकीस पादचा-यासह सर्वानां सर्वकाळ सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

**७) <u>गा-हयाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामन्यांच्या सुचना.</u>**

**अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण.**

या कार्यालयांतर्गत उप विभागाबाबत अथवा काही कामाबाबत तक्रारी असतील तर त्यासाठी नागरीकांनी विशिष्ट कार्यालयाविरुध्द गा-हयाणी / तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाः उप विभागीया कार्यालयाविरुध्द गा-हाणी/ तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचे कडे गा-हयाणे मांडावे व तक्रार नोंदवावी. विभाग कार्यालया विरुध्द गा-हाणे /तक्रारी असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंताकडे ग-हाणे/तक्रार नोंदवावी, व मंडळ कार्यालयाविरुध्द तक्रार /गा-हाणे असल्यास मुख्य अभियंता यांचे कडे गा-हाणे मांडावीत आणि तक्रार नोंदवावी. अशी गा-हाणी / तक्रारीचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून सात दिवसात कळविण्यात येईल गा-हाणी/तक्रारी नोंदवीण्यासाठी प्रत्येक कार्यालयात तक्रार पेटी ठेवण्यात येत आहे. गा-हाणी / तक्रारी समक्ष भेटीत पत्राने व ईमेल व्दारे ही नागरीक मांडू शकतात.

**ब) नागरीकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन.**

या विभागाच्या नागरीकांच्या सनदेच्या उपयुक्तेबाबतचा तथा परिणाम कारकतेचा आढावा राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

**क) जनसामन्य कडून सुचना.**

या विभागाची ही नागरीकांची सनद सर्व सामान्य नागरीकांच्या छाननी साठी नेहमीच खुली असेल व सन्मानीय नागरीकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांर्भीयपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवुन आणता येइल. ही नागरीकांची सनद ही स्वतःहुन काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवाउपभोगणा-या नागरीकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ८) <u>नागरीकांच्या सनदेची अमलबजावणी व प्रतिसाद.</u>

राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद अंतर्गत नागरीकांच्या अंमलबजावणी संसदेच्या /११/२००४ पासुन करण्यास विभाग कटीबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरीकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील. राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद खात्री पुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. तसेच कुठल्याही माहितीसाठी नागरीकांना संवेदनशील, सौजन्य पुर्ण मदत करण्याच्या भावनेने वर्तणुक मिळेल. ग्राहक केंद्रीत सेवेची उदीष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरीकांचा सल्ला घेतला जाईल. प्रशिक्षित व प्रोत्साहीत वर्गाव्दारे ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरीकांच्या ग्रा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रार शुन्य सेवा असल्याची खात्री करण्यात येईल.

**परिशिष्ट 'अ'**

**मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.), महाराष्ट्र शासन, ५ वा मजला, नवी मुंबई यांचे अधिनस्त**
**अधिक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, ओरंगाबाद अंतर्गत वृक्ष तक्ता**

**कार्यकारी अभियंता**
**राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद**

- **सहाय्यक कार्यकारी अभियंता**
  राष्ट्रीय महामार्ग उप विभाग, औरंगाबाद
- **सहाय्यक कार्यकारी अभियंता**
  राष्ट्रीय महामार्ग उप विभाग, कन्नड
- **उप अभियंता**
  विशेष प्रकल्प उप विभाग क्र.२, सिल्लोड (अ.अ.सा.बां.मंडळ, औरंगाबाद यांच्या अधिनस्त)
- **उप अभियंता**
  विशेष प्रकल्प उप विभाग, वैजापुर (अ.अ.सा.बां.मंडळ, औरंगाबाद यांच्या अधिनस्त)

**परिशिष्ट ‘क’**

**कार्यपुर्तीचे वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यापुर्तीचा कालवधी (मर्यादा) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन प्राप्त अर्जावर अकृषीक अभिप्राय/ना हरकत अभिप्राय. | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| २ | पेट्रोलपंप पेट्रोलपंपाच्या पोहच मार्गाचे शासन, नवी दिल्ली यांना नाहरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यकारी अभियंतायांचे कडून विहीत मार्गाने भुतल परिवहन मंत्रालय, केंद्र शासनास सादर करण्यात येते शासन (सक्षम अधिकारी केंद्र शासन) | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ३ | रस्ता ओलांडुन जाणा-या वाहनांसाठी वाहीण्यासाठी रस्त्याच्या बाजुला टाकण्यात येणा-या वाहीण्यांसाठी (केबल, पाणीपुरवठा, मलनिस्सारण इत्यादी) वाहीण्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यकारी अभियंता यांचेकडून विहित मार्गाने मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, महाराष्ट्र शासन, कोकन भवन नवी मुंबई यांना सादर करण्यात येते. | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ४ | रस्त्याच्या बाजुला जाहिरात फलके लावणे बाबत नाहरकत प्रमाणपत्रे दणे. | कार्यकारी अभियंता यांचेकडून विहित मार्गाने मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, महाराष्ट्र शासन , कोकन भवन, नवी मुंबई यांना सादर करण्यात येते. | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |

## नागरिकांची सनद

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यालयाचे संपुर्ण नाव | कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, पदमपूरा, औरंगाबाद |
| २. | कार्यालयाचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक | सार्वजनिक बांधकाम परिसर, पदमपूरा, औरंगाबाद. ०२४०-२३५११६२ |
| ३. | कार्यालय प्रमुख व अपिलीय अधिकारी | श्री. एस.आर. कातकडे, कार्यकारी अभियंता |
| ४. | शासकीय माहीती अधिकारी | श्री. वाय.बी. कुलकर्णी, उप-कार्यकारी अभियंता |
| ५. | सहाय्यक शासकीय माहीती अधिकारी | श्री. मोहम्मद नसीर, प्रथम लिपीक |
| ६. | कार्यालयात एकुण कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या | १०२ |
| ७. | कार्यक्षेत्र | राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ कि.मी. २२१/०० ते ३७९/७६० |
| ८. | कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील कार्यालये | १. राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, औरंगाबाद.<br>२. राष्ट्रीय महामार्ग उप-विभाग, कन्नउ. |
| ९. | कामाचे स्वरूप | मुद्या क्रं. ७ मधील राष्ट्रीय महामार्गाच्या लांबीची देखभाल व दुरूस्ती |
| १०. | कार्यालयाकडे असलेली यंत्रसीमुग्री | --निरंक-- |
| ११. | कार्यालयाकडे असलेली निरक्षण वाहणे | ३ (तीन) १. एम.एच. ३१/ जी-९८५२<br>२. एम.एच. २०/ए.वाय-६८७१<br>३. एम.एच. २०/ए.वाय-८७४७ |
| १२. | कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद विभाग/उप-विभागातील एकुण कर्मचारी | १. विभागीय कार्यालय- ३४<br>२. उप-विभाग, कन्नड- १८<br>३. उप-विभाग, औरंगाबाद- २६<br>४. उप-विभाग, सिल्लोड- ०८<br>५. उप-विभाग, वैजापुर- १२<br>**एकुण- ९८** |

कार्यकारी अभियंता<br>
राष्टींय महामार्ग विभाग<br>
औरंगाबाद